www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | वर्ष - ०२ | अंक २४ | पृष्ठे- ०६ | ठाणे, बुधवार २९ मे २०२४ | RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 | रु.२/-

# रस्त्यांची कामे ७ जूनपर्यंत पूर्ण न झाल्यास कंत्राट रद्द होणार; अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांचा सक्त आदेश



● मुंबई, यश सावंत :

महानगरपालिका प्रशासनातर्फे मुंबईत सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामातील दिरंगाई आणि गुणवत्तेशी तडजोड अजिबात खपवून घेतली जाणार नाही. सध्या सुरू असलेली रस्त्यांची कामे संबंधित कंत्राटदारांनी ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत. तसेच, येत्या ७ जून पूर्वी हे रस्ते पूर्णपणे वाहतूकयोग्य झाले पाहिजेत. अन्यथा त्यांच्याकडून ते काम काढून घ्यावे आणि अन्य दुसऱ्या कंत्राटदाराची नेमणूक करून कामे पूर्ण करावीत. तसेच, या कामांचा खर्च मूळ कंत्राटदाराकडून वसूल करावा. तसेच संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, असे आदेश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मुंबई महानगरात ठिकठिकाणी रस्ते बांधणी व दुरुस्तीची कामे वेगाने पूर्ण केली जात आहेत. बांगर यांनी ठिकठिकाणी रस्ते कामांची पाहणी केली. आर दक्षिण आणि आर मध्य विभागातील रस्त्यांच्या कामांची नुकतीच पाहणी करून आढावा घेतला. रस्ते कामाशी संबंधित असलेल्या विविध विभागांनी आपापसात योग्य समन्वय ठेवून वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने कामे पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रित करावे. पावसाळ्यात नागरिकांना त्रास होऊ नये, तसेच अपूर्ण कामांमुळे कोणतीही जीवितहानी होवू नये यासाठी सुरू असलेल्या रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे गरजेचे आहे.

येत्या २८ मे रोजी रस्ते कामांचे मूल्यमापन करावे. ज्या रस्त्यांच्या कामांची प्रगती समाधानकारक आढळणार नाही त्याच्याशी संबंधित कंत्राटदारांना नोटीस जारी करावी. तसेच, ३१ मेपर्यंत रस्त्याची कामे पूर्ण न केल्यास आणि ७ जून पर्यंत रस्ते वाहतूक योग्य स्थितीत न आणल्यास त्यांच्याकडून ते कंत्राट काढून घ्यावे. त्यानंतर संबंधित कामासाठी अन्य कंत्राटदाराची नियुक्ती करून काम पूर्ण करून घ्यावे. या कामाचा संपूर्ण खर्च व दंड मूळ नियुक्त कंत्राटदाराकडून तात्काळ वसूल करावा, असे आदेश बांगर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. ही कार्यपद्धती मुंबईत सुरू असलेल्या सर्व रस्ते कामांसाठी लागू असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पान २ वर

## थोडक्यात




### आम आदमी पक्षाच्या आतिशी यांच्याविरोधात कोर्टाने बजावले समन्स, केजरीवालही सदर प्रकरणात आहेत आरोपी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

आम आदमी पक्षाच्या नेत्या आणि दिल्लीच्या शिक्षण मंत्री आतिशी यांच्याविरुद्ध राउज एव्हेन्यू कोर्टाने मंगळवारी समन्स जारी केले आहे. मानहानीच्या प्रकरणात आतिशी यांच्याविरोधात हे समन्स जारी करण्यात आले आहे.

कोर्टाने आतिशी यांना २९ जून रोजी हजर राहण्याचे समन्स बजावले आहे. याचबरोबर, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे देखील या प्रकरणात आरोपी आहेत.

दिल्लीतील भाजपा नेते प्रवीण शंकर कपूर यांनी अरविंद केजरीवाल आणि शिक्षण मंत्री आतिशी यांच्या विरोधात कोर्टात फौजदारी मानहानीची तक्रार दाखल केली होती. भाजपा आम आदमी पक्षाच्या आमदारांना विकत घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आतिशी यांनी केला होता. या विधानाविरोधात भाजपा नेत्याने मानहानीचा खटला दाखल केला होता.

पान २ वर

### शेतकऱ्यांनो पेरणीसाठी तयार रहा ! 'या' तारखेला राज्यात मान्सूनचं होणार आगमन

● मुंबई, दिगंबर जाधव :



राज्यातील शेतकरी वरुणराजाची आतुरतेने वाट पाहत आहेत. अनेक भागांमध्ये पाण्यासंदर्भात बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्यातील शेतकरी चिंतेत आहे. अशातच आता भारतीय हवामान विभागाने मान्सूनबद्दल दिलासा देणारी बातमी दिली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार मान्सून दाखल होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असून मान्सूनच्या प्रवासाने वेग घेतला आहे. ज्यामुळे पुढील पाच दिवसांमध्ये मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

पान २ वर

## "ससूनभोवती दाटलेले संशयाचे धुके...", सुप्रिया सुळेंनी सरकारकडे केली मागणी



● पुणे, अभिजित येरल्लू :

ललित पाटील प्रकरणापासून ससून रुग्णालयातील गैरकारभार सातत्याने समोर येत आहे. आता पुणे अपघात प्रकरणातही अल्पवयीन चालकाच्या रक्ताची चाचणी करताना ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी फेरफार केल्याचा आरोप केला जात आहे. याप्रकरणी सातत्याने ससूनच्या व्यवस्थापनावर आरोप केले जात आहेत. यावरून सुप्रिया सुळे यांनी शासनाकडे महत्त्वाची विनंती केली आहे."पुणे जिल्हा आणि परिसरातील गोरगरीब रुग्णांना उत्कृष्ट वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात ससून रुग्णालयाने सिंहाचा वाटा उचलला आहे. परंतु गेली काही दिवसांपासून या रुग्णालयाबाबत सातत्याने तक्रारी येत आहेत", असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या की, "काही दिवसांपूर्वी ड्रग तस्कर ललित पाटील प्रकरणी हे रुग्णालय चर्चेच्या केंद्रस्थानी होते. तर आता कल्याणीनगर 'हिट अॅन्ड रन' प्रकरणी आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलल्याचे प्रकरण चर्चेत आहे. याप्रकरणी दोन वरीष्ठ डॉक्टरांना अटक देखील करण्यात आली.

पान २ वर

## मद्यधुंद अवस्थेत दोघांना चिरडणाऱ्या रितिका मालू यांना जामीन नाहीच

● नागपूर, नितीन देवळेकर :




देशभर गाजत असलेल्या पुणेतील पार्शे कारसारखा भीषण अपघात करणाऱ्या नागपूरच्या ३९ वर्षीय धनाढ्य महिला रितिका उर्फ रितू दिनेश मालू यांची तात्पुरता अटकपूर्व जामीन देण्याची विनंती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी अमान्य केली. त्यामुळे मालू यांना जोरदार दणका बसला. त्यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्यासमक्ष सुनावणी झाली. ही हृदयद्रावक घटना २५ फेब्रुवारी २०२४ रोजी मध्यरात्रीनंतर दीडच्या सुमारास मुख्य रेल्वेस्थानकाजवळच्या रामझुल्यावर घडली. रितिका मद्यधुंद अवस्थेत भरधाव वेगात मर्सिडिज कार चालवित होत्या. दरम्यान, त्यांची कार अनियंत्रित होऊन आधी रामझुल्याच्या कठड्याला धडकली व त्यानंतर कारने मोहम्मद हुसैन गुलाम मुस्तफा (३४, रा. नालसाहब चौक) व मोहम्मद आतिफ मोहम्मद जिया (३४, रा. जाफरनगर) हे दोन तरुण मित्र स्वार असलेल्या दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यामुळे दोन्ही तरुण दूरवर फेकले जाऊन गंभीर जखमी झाले. घटनास्थळावरील नागरिकांनी त्यांना जवळच्या मेयो रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉक्टरांनी मोहम्मद हुसैनला तपासून मृत घोषित केले, तर मोहम्मद आतिफचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दोन्ही तरुण बँक फायनान्सचे काम करीत होते. त्यांना या क्षेत्रात खूप पुढे जायचे होते. परंतु, रितिकाच्या नशेने त्यांचे स्वप्न उद्ध्वस्त केले.

तहसील पोलिसांनी रितिकाविरुद्ध भादंवि कलम ३०४ (सदोष मनुष्यवध), (निष्काळजीपणाने २७९ वाहन चालविणे), ३३६ (मानवी जीव धोक्यात टाकणारी कृती करणे), ३३८ (गंभीर जखमी करणे), ४२७ (आर्थिक नुकसान करणे) आणि मोटर वाहन कायद्यातील कलम १८४ (भरधाव वेगात वाहन चालविणे) व १८५ (दारूच्या नशेत वाहन चालविणे) या गुन्ह्यांतर्गत एफआयआर दाखल केला आहे. रितिकाने सुरुवातीला सत्र न्यायालयात अर्ज दाखल करून अटकपूर्व जामीन मागितला होता.

पान २ वर

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली शहरातील नालेसफाईची पाहणी



● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे महापालिका क्षेत्रात नाले सफाईची कामे वेगाने सुरू आहेत. ही कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचा निर्धार या पाहणी दरम्यान महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी व्यक्त केला. मंगळवारी झालेल्या या पाहणी दौऱ्यात आनंद नगर येथील नाले सफाईचे काम आयुक्त राव यांनी पाहिले. या नाल्याचा काही भाग मुंबई महापालिका हद्दीत आहे. त्यांच्याशी समन्वय साधून येथील सफाईचे काम होत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यांनतर, रेल्वे मार्गाखालून जाणाऱ्या, ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या मागे असलेल्या नाल्याची सफाईचे काम आयुक्त यांनी पाहिले.

या नाल्यातून मोठ्या प्रमाणावर गाळ काढण्यात आला आहे. रेल्वे मार्गाखाली असलेल्या भागातून सफाई करणे आव्हानात्मक असले तरी ते काम व्यवस्थित केले जावे, अशी सूचना यावेळी त्यांनी दिली. त्यानंतर, वर्तकनगर येथील दोस्ती शेजारील नाला, महात्मा फुले नगर येथील नाला आणि कोरम मॉल लगतचा नाला यांची पाहणी आयुक्त राव यांनी केली.

पान २ वर

## बेकायदा हॉटेल्स, पब्ज, डान्स बारवर कारवाई करा, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे आदेश

● ठाणे, विशाल कारंडे :



ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या बेकायदा हॉटेल्स, पब्ज, डान्स बारवर तातडीने कारवाई सुरू करा. या कारवाईत कोणीही पोलीस अधिकाऱ्याने हलगर्जीपणा केला तर, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा ठाणे पोलीस आयुक्त डॉ. आशुतोष डुंबरे यांनी मंगळवारी ठाणे पोलीस आयुक्तालयात घेतलेल्या परिमंडळातील पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिला. पुणे येथील एका धनाढ्याच्या मुलाने दोन संगणक अभियंत्यांना मद्यसेवन करून वाहन चालविताना उडविले. या घटनेने राज्यात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त डुंबरे यांनी ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील कल्याण, भिवंडी, उल्हासनगर परिमंडळ क्षेत्रातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची मंगळवारी बैठक घेतली. या बैठकीत परिमंडळ हद्दीत बेकायदा हॉटेल्स, पब्ज, डान्सबार रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असतील तर त्यांच्यावर तातडीने कारवाई सुरू करावी. कोणीही अधिकारी या कारवाईत कुचराई करत असेल, याची माहिती मिळाल्यास संबंधितावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त डुंबरे यांनी दिला.

ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील भिवंडी परिसर, कल्याण शिळफाटा, नेवाळी, अंबरनाथ, उल्हासनगर परिसरात अधिक संख्येने डान्सबार आहेत. काही ठिकाणी पब्ज, बेकायदा हॉटेल्स, ढाबे आहेत. ढाब्यांवर चोरून मद्य विकले जाते. या ढाब्यांना शासनाची परवानगी नाही. डान्सबार बंद असताना ते रात्री उशिरापर्यंत चालविले जात असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. याविषयी ठाणे पोलीस आयुक्तालयापर्यंत अनेक तक्रारी गेल्या आहेत असे समजते.

पान २ वर

## साडेचार लाख रुपयांना बाळाची विक्री, तृतीयपंथीयांसह सहा जणांना अटक

● मुंबई, सचिन कदम :



दीड वर्षाच्या मुलाची साडेचार लाख रुपयांना विक्री केल्याच्या आरोपाप्रकरणी दोन तृतीयपंथीयांसह सहा जणांना पोलिसांनी अटक केली. आरोपीमध्ये मुलाच्या आई-वडिलांचाही समावेश आहे. याप्रकरणी डीएन नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी स्वतः तक्रार केली असून त्यांच्या तक्रारीवरून आरोपींविरोधात भादंवि कलम ३७०, ३४ सह अल्पवयीन न्याय (काळजी व संरक्षण) कायदा कलम ८० व ८१ अंतर्गत सहाजणांविरोधात डीएन नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक सीमा खान (३२) या प्रकरणातील तक्रारदार आहेत. तक्रारीनुसार, हुसैन शेख या एक वर्ष सात महिन्यांच्या मुलाची विक्री करण्यात आली. मुलाची आई नाजमीन शेख व वडील मोहम्मद शेख मालाड मालवणी परिसारीतल अब्दुल हमीद रोड परिसरातील वास्तव्यास आहेत. या दाम्पत्याने स्वतः आपल्या बाळाची विक्री केली. त्यासाठी अंधेरी पश्चिम इंदिरा नगर येथील तृतीयपंथी सायबा अन्सारी, त्याच परिसरात राहणारी राबिया अन्सारी व सकीना बानू शेख यांच्या मध्यस्थीने या बाळाची विक्री करण्यात आली.

पान २ वर

## तोतया पोलिसाला अटक, अनेकांना फसविल्याची शक्यता

● विरार, विशाल पाटील :

वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी मोबाईल चोरीच्या प्रकरणात अटक केलेला एक आरोपी नकली पोलीस बनून वावरत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून पोलिसांच्या गणवेशाषह पोलिसांच्या वापरातील विविध ३० वस्तू जप्त केल्या आहेत. पोलिसांनी आरोपीकडून दोन गुन्ह्यांची उकलही केली आहे.

वसईतील महेंद्रकुमार पुरोहीत या फिर्यादीचे मोबाईल विक्रीचे दुकान आहे. या दुकानातून काही दिवसांपूर्वी एका इसमाने १ लाख ६० हजारांचा मोबाईल फोन विकत घेतला होता. मात्र आरोपीने १ लाख १० हजार एनईएफटी केल्याचा बनावट मेसेज दाखवून फिर्यादीची दिशाभूल केली तसेच ५० हजारांचा दिलेला धनादेश वटला नव्हता.या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखला होता. वालीव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने या प्रकरणी फैजल अबुल हसन शेख (२८) या आरोपीला अटक केली. यापूर्वी देखील आरोपीने अशाच प्रकारे फसवून दुचाकी विकत घेतली होती.



मात्र तपासात तो नकली पोलीस म्हणून वावरत असल्याचे आढळून आले. पोलीस निरीक्षक दर्जाचा पोलीस अधिकारी वापरत असलेले ३ खाकी गणवेश, १ पिकॅप, ३ गोल बॅरी कॅप, मुंबई पोलीस नाव असलेली गोल टोपी, एक हाथकडी (बेडी), लाल रंगाचा बेल्ट स्टीलचे बक्कलसह, उच्चप्रतीची एअरगण, पोलीस निरीक्षकाचे स्वतःचे नावे पोलीस विभागाचे ओळखपत्र, तसेच स्कॅन करुन तयार केलेले पोलीस शिपाई पदाचे नियुक्ती पत्र अशा एकुण ३० पेक्षा अधिक पोलीस विभागाशी निगडीत असलेल्या वस्तू मिळून आलेल्या आहेत. त्यामुळे तो नकली पोलीस बनून वावरत असल्याचे निष्पन्न झाले. त्याने पोलीस बनून कुणाची फसवणूक केली का त्याचा पोलीस तपास करत आहेत.

वरील कामगिरी पोलीस उपायुक्त पोंणिमा श्रींगी-चौगुले, सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने-पाटील, वालीवचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सैय्यद जिलानी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोलीस हवालादर मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी केली आहे.

## नवी मुंबई आरटीओने 'ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई' ही विशेष मोहीम घेतली हाती



● नवी मुंबई, भावना जैन :

> पुण्यातील घटनेचे पुनरावृत्ती होऊ नये याकरता नवी मुंबई शहरात ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई विशेष मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये आत्तापर्यंत कारवाई केलेल्या वाहन मध्ये ड्रंक अँड ड्राईव्ह केस आढळली नाही.
>
> **- हेमांगिनी पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई आरटीओ**

पुणे येथील मद्यपान करून गाडी चालवित निष्पाप जीवांचा बळी घेतला गेला. त्यामुळे ड्रंक अँड ड्राईव्ह सध्या चर्चेचा विषय झाला आहे. त्याच अनुषंगाने नवी मुंबई आरटीओने ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई ही विशेष मोहीम हाती घेऊन सोमवारी कारवाईला सुरुवात केली. मात्र ड्रंक अँड ड्राईव्ह केसेस आढळल्या नसून इतर त्रुटी आढळलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई शहरातील सायन पनवेल महामार्गावरील तुर्भे, बेलापूर, नेरुळ याठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. सध्या पुण्यातील ड्रंक अँड ड्राईव्ह घटनेबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. यामध्ये निष्पाप जीवांना मात्र आपल्या प्राणाला मुकावे लागले आहे. अशी घटना नवी मुंबई शहरात घडू नये याकरिता नवी मुंबई आरटीओ विभागाने ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. सोमवारी एका दिवसात तब्बल ११ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

पान २ वर

## थोडक्यात



### स्वातंत्र्यवीर सावरकरांना ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

● ठाणे (जिमाका)- स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेला त्यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात तहसिलदार संजय भोसले यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.


### मुरबाड मध्ये संजय गांधी निराधार योजनेचे थकित अनुदान मिळण्यासाठी मुरबाड तहसीलदारांना निवेदन !



● मुरबाड - समाजातील निराधार दिव्यांग नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या सामाजिक न्याय विभागाअंतर्गत संजय गांधी निराधार योजने चे अनुदान मुरबाड तालुक्यात गेले तीन महिने न मिळाल्याने संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थींच्या मागणीनुसार आज मुरबाड तहसीलदार संदीप आवारी यांना राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल चौधरी व त्यांच्या समवेत रोहित झुंजारराव यांनी निवेदन देऊन चर्चा केली

तहसीलदारांनी सदर निवेदनाची दखल घेऊन त्वरित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून येत्या सात दिवसांत लाभार्थ्यांच्या खात्यावर थकीत अनुदान दिले जाईल असे आश्वासन दिले. यावेळी विठ्ठल चौधरी रोहित झुंजारराव यांनी तहसीलदारांचे आभार मानले.

# कल्याण-सीएसएमटी वातानुकूलित लोकलमधील शीत यंत्रणा बंद, प्रवासी उकाडा, घामाने हैराण





● कल्याण – कल्याण ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकलमधील काही डब्यांमधील वातानुकूलित यंत्रणा दोन दिवसांपासून बंद असल्याने प्रवासी लोकलच्या डब्यात बटाट्यासारखे उकडून निघत आहेत. उकाड्यामुळे बहुतांशी प्रवासी वातानुकूलित लोकलला आता पसंती देत आहेत. डब्यात घुसल्यानंतर काही क्षणात प्रवाशांना डब्यातील वातानुकूलित यंत्रणा बंद असल्याचे लक्षात आल्यावर प्रवाशांचा संताप होत आहे.

अगोदरचा उकाड्याने नागरिकांचा घामटा निघाला आहे. सकाळची वेळ असली तरी उकाडा प्रवाशांची पाठ सोडत नाही. सकाळची वेळ असूनही घाम पुसून पुसून प्रवाशांचे रुमाल ओलेचिंब होत आहेत. अशा परिस्थितीत वातानुकूलित लोकलमधून मस्त समाधानाने प्रवास करून या विचाराने या लोकलमध्ये चढून मुंबईपर्यंतचा प्रवास करणारे प्रवासी लोकलमधील वातानुकूलन यंत्रणा बंद राहत असल्याने संताप व्यक्त करत आहेत. वातानुकूलित लोकलमधील शीत यंत्रणा सुरू आहे की नाही हे लोकल सुरू करण्यापूर्वी कारशेडमध्ये तपासले जाते की नाही, असे प्रश्न प्रवासी उपस्थित करत आहेत.

कल्याणमधून सकाळी सुटणारी वातानुकूलित लोकल डोंबिवली रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक पाचवर सकाळी नऊ वाजता येते. ही लोकल मुंबईत कार्यालयीन वेळेपूर्वी पोहोचत असल्याने बहुतांशी प्रवाशांची या लोकलला पसंती असते. गेल्या दोन दिवसांपासून प्रवासी या लोकलमध्ये चढत आहेत. लोकलमध्ये चढल्यानंतर काही डब्यांमधील वातानुकूलन यंत्रणा बंद असल्याचे प्रवाशांच्या निदर्शनास येत आहे. शीत यंत्रणा बंद असेल तर प्रवाशांना डब्यामध्ये सूचना करणारे एक लाल बटन आहे. ते दाबल्यानंतर मोटरमन, गार्डकडून त्याची दखल घेतली जाते. हे सूचना बटन दाबूनही त्याची मोटारमन, गार्डकडून दखल घेतली जात नाही, असे डोंबिवलीतील एक प्रवासी तुषार साठे यांनी सांगितले.

■ एकदा वातानुकूलित लोकलमध्ये चढल्यानंतर पुन्हा ती लोकल सोडून दुसऱ्या लोकलमध्ये चढणे प्रवाशांना शक्य होत नाही. त्यामुळे कोंडमारा करत, गुदमरत प्रवासी वातानुकूलित लोकलमधून प्रवास करत आहेत. अनेक प्रवाशांना अती उकाड्यामुळे डब्यात अस्वस्थ वाटू लागले की ते पुढील रेल्वे स्थानकात उतरत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या. प्रवासी वातानुकूलित लोकलचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न करतात. पण दरवाजेही उघडत नसल्याने जीव गुदमरत प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे.

■ मध्य रेल्वे मार्गावरील प्रवासी सोशिक आहेत, असे समजून वातानुकूलित लोकलमधील बिघाड नाही काढला तरी चालेल असा विचार रेल्वे अधिकाऱ्यांनी करू नये. अन्यथा, रेल्वे प्रवाशांच्या उद्रेकाला एक दिवस रेल्वे प्रशासनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

■ सकाळच्या कल्याण-सीएसएमटी लोकलमधील काही डब्यांमधील वातानुकूलित यंत्रणा बंद राहत असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. डब्यात सूचना बटन असूनही त्याचाही उपयोग होत नसल्याने प्रवासी डब्यामध्ये अक्षरश बटाट्यासारखे उकडून निघत आहेत. लोकल प्रवासी सेवेत सोडण्यापूर्वी त्यामधील शीत यंत्रणा सुरू आहे की नाही हे तपासण्याची तसदी तांत्रिक विभागाने घ्यावी. काही दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होईल का. – तुषार साठे, प्रवासी.

## मुब्र्यात बंद घरामध्ये लागली आग, घरातील साहित्य जळून खाक



● मुंब्रा : येथील एका बंद घरामध्ये लागलेल्या आगीत घरातील विविध प्रकारचे साहित्य जळून खाक झाले. या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. मुंब्रा शहरातील कौसा भागातील रशिद कंपाउंड परीसरातील नसीम अपार्टमेंन्ट या तळ अधिक चार मजली इमारतीच्या बी विंग मधील तिसऱ्या मजल्यावर असलेल्या रुम नंबर ३०६ मध्ये मंगळवारी रात्री एक वाजण्याच्या सुमारास आग लागली. सध्या ही रुम बंद आहे.

आग लागल्याची माहिती मिळताच वीज वितरण करणाऱ्या खाजगी कंपनीचे कर्मचारी आणि मुंब्रा अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी अथक प्रयत्नानी दोन फायर आणि एक रेस्क्यू वाहनांच्या मदतीने मध्यरात्री दोन वाजून १० मिनिटांच्या सुमारास आग पूर्णपणे विझवली. या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. मात्र घरातील बेड, पंखा, कपडे, कपाट, वातानुकुलित (एसी)यंत्र, टिव्हि, विद्युत वायरींग आदि साहित्य जळाले असल्याची माहिती ठामपाच्या अप्तकालिन कक्षातील अधिका-यांनी दिली.

## डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांचे सर्वेक्षण

### गॅस गळती, सांडपाणी यामुळे होणाऱ्या प्रदूषणावर करडी नजर



● ठाणे : डोंबिवलीतील अमुदान रासायनिक कंपनीतील स्फोटानंतर खडबडून जागे झालेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उशिरा का होईना अखेर डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणांतर्गत प्रत्येक रासायनिक कंपन्यांची तपासणी केली जात असून गॅस गळती, सांडपाणी त्याचे दुष्परिणाम आणि इतर संभाव्य धोक्यांबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सविस्तर माहिती घेतली जात आहे. या माहितीच्या आधारे त्याबाबत पुढील कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती प्रदूषण मंडळाच्या कल्याण प्रादेशिक कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी कारखान्यांचा संवर्गनिहाय तपशील जाहीर करण्यात येत असतो. यंदाच्या संवर्गनिहाय तपशिलामध्ये ठाणे जिल्ह्यात तब्बल २ हजार २९४ कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक हा ६० हून अधिक होता. यामध्ये कल्याण आणि डोंबिवली येथील कारखान्यांची संख्या ३०९ इतकी होती, तर ४१ ते ५९ इतका प्रदूषण निर्देशांक असलेल्या कारखान्यांची संख्या ७३ इतकी होती. यामुळे डोंबिवलीतील रासायनिक कारखान्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्याबरोबरच येथील कारखान्यांमधून निघणाऱ्या उत्सर्जित घटकांमुळे प्रदूषणाची समस्या देखील गंभीर असल्याचे समोर आले होते. तर याचेच दुष्परिणाम म्हणून डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचा रंग गुलाबी होणे, नाल्याच्या पाण्याला दुर्गंधी येणे, हिरवा पाऊस पडणे यांसारख्या अनेक गंभीर स्वरूपाच्या घटना समोर आल्या होत्या. मात्र यांनतर प्रदूषण मंडळाकडून हवी तशी कठोर कारवाई न झाल्याने नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात असंतोष व्यक्त करण्यात आला होता.

डोंबिवलीत नुकताच अमुदान रासायनिक कंपनीत झालेल्या भीषण स्फोटामुळे या कारखान्यांचा सुरक्षा आणि त्यामुळे होणारे तीव्र प्रदूषण विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानुसार येथील धोकादायक कारखान्यांचे तातडीने स्थलांतर करण्यात येणार आहे.

## कोलंबो, श्रीलंका येथे स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधींच्या आंतरराष्ट्रीय बैठकीसाठी कॉ. डॉ. कविता वरे यांची निवड!



● मुरबाड - २५ते २७ जून २०२४ दरम्यान कोलंबो, श्री लंका येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बैठकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्या आणि ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील किसळ गावच्या सरपंच कॉ. डॉ. कविता वरे यांची अभिनंदनीय निवड झाली आहे.

"महिलांच्या प्रतिनिधित्वाद्वारे सामाजिक प्रतिरोध मजबूत करणे" हा या बैठकीचा विषय आहे.

युरोपियन युनियन आणि कॅनडा सरकारने पुरस्कृत केलेल्या या बैठकीत जगातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे दीडशे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

इतक्या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय बैठकीसाठी कॉ. कविता वरे यांची झालेली निवड ही त्या लोक प्रतिनिधी म्हणून करत असलेल्या कार्याची पावती आहे. या बैठकीस उपस्थित राहून लोकशाही राजकीय प्रक्रिया मजबूत करण्याचे विविध आयाम समजून घेण्याची संधी त्यांना प्राप्त होत आहे. कॉ. डॉ कविता वरे यांच्या या विशेष निवडीबद्दल मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षास समाधान आणि अभिमान वाटत असून पक्षाची महाराष्ट्र राज्य कमिटी त्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे आणि बैठकीतील भरीव सहभागासाठी शुभेच्छा देत आहे, असे डॉ. उदय नारकर राज्य सचिव यांनी सांगितले.

## जितेंद्र आव्हाड महाड येथे करणार मनुस्मृतीचे दहन



● ठाणे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, 'एससीईआरटी'ने राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीमधील काही श्लोकांचा समावेश करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. त्यावर आक्षेप आणि सूचनाही मागवण्यात आल्या आहेत. मनुस्मृतीचा सामावेश या आराखड्यात असल्याने राज्य सरकारविरोधात टीकेची झोड उठविली जात आहे. राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. बुधवारी ते महाड येथे जाऊन मनुस्मृतीचे दहन करणार आहेत.

ज्या मनुस्मृतीने स्त्रियांचे अधिकार नाकारले, ज्या मनुस्मृतीमुळे आपले पूर्वज पाच हजार वर्ष त्रासात जगले, तीच मनुस्मृती पुन्हा एकदा हे सरकार आणत आहे, याचा तीव्र विरोध व्हायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या ठिकाणी या मनुस्मृतीचे दहन केले, त्याच ठिकाणी पुन्हा एकदा आपण जाऊन याचे दहन करणार आहोत आणि सरकारचा निषेध करणार आहोत त्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा, असे आवाहन डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे. सत्ताधारी मागच्या दाराने त्यांच्या मनातील गोष्ट पूर्ण करु पाहत आहेत. आमचे संविधान म्हणजेच मनुस्मृती, असे म्हणणारे जेव्हा सत्तेत येतात तेव्हा काय घडते, त्याचे उदाहरण म्हणजे पाठ्यपुस्तकांचा यादीत पुस्तकात मनुस्मृतीचा समावेश होत आहे. ज्या मनुस्मृतीने देशाचे वाटोळे केले, समाजात दुही माजवली आहे, समाजामध्ये चातुवर्ण्याचा समावेश केला, जातीभेद निर्माण केला, स्त्रियांना तर सर्वात वाईट वागणूक घेण्याची पद्धती या मनुस्मृतीने जन्माला घातली, ती मनुस्मृती परत आणली जात आहे असेही आव्हाड म्हणाले.

जे लोक १९५० मध्ये म्हणाले की, आम्हाला तुमचे संविधान मान्य नाही, आमचे संविधान म्हणजे मनुस्मृती. तेच लोक आता मनुस्मृती आणण्याचा प्रयत्न करत आहेत. तुम्हाला आणि आम्हाला संविधान वाचवायचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ मध्ये मनुस्मृती दहन केली आणि १९५० मध्ये संविधान जन्माला घातले. त्यासाठी आपण महाडला जात आहोत असे आव्हाड यांनी स्पष्ट केले.

## उल्हासनगरात ३१६ धोकादायक इमारती, ५ इमारती राहण्यासाठी अयोग्य, तर ४३ मध्ये तात्काळ दुरुस्ती करण्याची गरज

● उल्हासनगर: उल्हासनगर शहरात ३१६ धोकादायक इमारतींची यादी महापालिका प्रशासनाने जाहीर केली आहे. त्यात ५ इमारती अतिधोकादायक वर्गातील असून त्या तात्काळ रिकाम्या करण्याची गरज आहे. तर ४३ इमारती रिकाम्या करून त्यांची दुरुस्ती करण्याची गरज पालिका प्रशासनाने व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे ४४ धोकदायक इमारतींचे संरचनात्मक लेखा परीक्षण झालेले नसल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा धोकादायक इमारतींची संख्या घटली असून गेल्या वर्षात ३१० इमारती धोकादायक यादीत होत्या.

गेल्या काही वर्षात उल्हासनगर शहरात धोकादायक इमारतींची पडझड होऊन अपघात होण्याचे प्रमाण वाढले. परिणामी पालिका प्रशासनाने गेल्या काही वर्षांपासून संरचनात्मक लेखा परीक्षण करण्यावर भर दिला. शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास प्रश्न विविध कारणांमुळे रखडला होता. तो आता मार्गी लागला आहे. मात्र तरीही या काळात शहरात धोकादायक इमारती अस्तित्वात असून त्यात रहिवासी वास्तव्यास आहेत. परिणामी अपघात होण्याची भीती असते. अशा इमारतींचे संरचनात्मक लेखा परीक्षण करत त्यांची यादी पालिका प्रशासन जाहीर करते.



उल्हासनगर महापालिकेने नुकतीच शहरातील धोकादायक इमारतींची यादी जाहीर केली. या यादीत शहरातील चारही प्रभाग क्षेत्रातील ३१६ इमारतींचा समावेश आहे. यात पाच इमारती अतिधोकादायक वर्गातील आहेत. प्रभाग क्रमांक एक क्षेत्रात एक, प्रभाग क्रमांक दोनमध्ये दोन आणि प्रभाग क्रमांक चार क्षेत्रात दोन अशा पाच इमारती यात आहेत. या इमारती वास्तव्य करण्यास अयोग्य असून त्या इमारती पाडण्याची गरज आहे. तर ४३ इमारती रिकाम्या करून त्याची दुरुस्ती करण्याची गरज आहे. यात प्रभाग क्रमांक एक क्षेत्रात सात, प्रभाग क्रमांक दोनमध्ये १५, प्रभाग क्रमांक तीनमध्ये १० तर प्रभाग क्षेत्र क्रमांक चारमध्ये ११ इमारतींचा समावेश आहे.

यासोबतच रिकामी न करता दुरुस्ती करण्यायोग्य धोकादायक इमारतींची संख्या २०८ इतकी आहे. प्रभाग क्षेत्र क्रमांक एकमध्ये सर्वाधिक ७७ इमारती या प्रवर्गातील आहेत. तर ४४ धोकादायक इमारतींचे संरचनात्मक लेखा परीक्षण प्राप्त झाले नसल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे

## डेअरी उद्योगाला गोदरेज कॅपिटल करणार पतपुरवठा


● ठाणे - गोदरेज उद्योग समुहातील गोदरेज कॅपिटलने डेअरी उद्योगाला कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. क्रीमलाइन डेअरी प्रॉडक्ट्स लि. आणि द्वारा ई-डेअरी यांच्यासोबत यासाठी धोरणात्मक भागीदारी करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत देशभरातील लहान डेअरी फार्म मालकांना पतपुरवठा केला जाणार आहे. क्रीमलाइन डेअरी प्रॉडक्ट्स ही गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडची उपकंपनी आहे.

दुग्धजन्य पदार्थांचा वापर वाढत असल्याने दुग्ध व्यवसाय ही शेतकऱ्यांसाठी उत्तम संधी आहे. या क्षेत्रात उत्पादकता सुधारण्याची गरज आहे आणि त्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर पतपुरवठा होणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन गोदरेज कॅपिटलने या क्षेत्रात प्रवेश केला आहे. दुग्धव्यवसायासाठी कर्ज देण्यासोबतच गोदरेज कॅपिटल शेतकऱ्यांना जनावरांची खरेदी आणि त्यांच्या देखभालीसाठी तारण-मुक्त कर्ज उपलब्ध करून देणार आहे. कर्ज वितरणासाठी पूर्णतः डिजिटल प्रक्रियेचा अवलंब केला जाणार आहे.

दुग्धव्यवसायाला आर्थिक सहाय्य आणि प्रोत्साहनाची आवश्यकता आहे. त्यामुळे हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. कृष्णागिरी जिल्ह्यात पहिल्या कर्जाचे वितरण करण्यात आले आहे. तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे गोदरेज कॅपिटलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष शाह यांनी यानिमित्ताने सांगितले.

डेअरी उद्योगाचे कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान आहे. यावर सुमारे 80 दशलक्ष शेतकऱ्यांची उपजीविका चालते. दुग्ध उत्पादनासाठी लागणाऱ्या एकूण खर्चापैकी 70 टक्के खर्च हा पशुआहारावर होतो, असे भूपेंद्र सुरी यांनी सांगितले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत शेतकऱ्यांना गोदरेज कॅपिटलच्या पतपुरवठा योजनेचा खऱ्या अर्थाने फायदा होईल, असे द्वारा ई डेअरीचे संस्थापक के. ए. रवी यांनी नमूद केले. कोल्हापूर, ठाणे आदी ठिकाणी आमच्या कंपनीने ठसा उमटवला आहे, असेही ते म्हणाले.

## हृतिक रोशनचा मुलगा झाला पदवीधर



बॉलीवूड अभिनेता हृतिक रोशन व सुझान खान यांनी २०१४ मध्ये घटस्फोट घेतला. १३ वर्षांच्या सुखी संसारानंतर दोघांनी विभक्त व्हायचं ठरवलं. आता घटस्फोट होऊन बरीच वर्षे झाली आहेत. तसंच आता दोघांना नवे जोडीदार देखील भेटले आहेत. पण तरीही कोणताही कार्यक्रम असो, त्यामध्ये हृतिक व सुझान एकत्र दिसतात. हृतिक व सुझानला दोन मुलं आहेत. त्यांचा मोठा मुलगा रेहान नुकताच पदवीधर झाला. हा अभिमानस्पद क्षण पाहण्यासाठी हृतिक व सुझान खास एकत्र उपस्थित राहिले होते. याचा व्हिडीओ सुझानने चाहत्यांबरोबर शेअर केला आहे.

"'आम्ही कुठे जाऊ हे कोणास ठाऊक नाही...पण मला हे सांगायचं आहे की, मी माझ्या वाटेवर आहे...' माझ्या मुला अभिनंदन. मी तुझ्याकडून रोज शिकते. तुझी आई असल्याचा मला अभिमान आहे. रेहान तुझ्या आयुष्यातील छान दिवसांची ही सुरुवात आहे", असं कॅप्शन लिहित सुझानने लेकाच्या पदवी प्रदान समारंभाचा व्हिडीओ शेअर केला आहे. आपल्या मुलाला शुभेच्छा आणि प्रोत्साहन देण्यासाठी हृतिक व सुझानने पदवी प्रदान समारंभाला एकत्र हजेरी लावली होती. या व्हिडीओमध्ये एकत्र कुटुंबाचे फोटो देखील पाहायला मिळत आहेत.

सुझानने शेअर केलेल्या या व्हिडीओवर अनेक कलाकारांसह चाहत्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसंच तिचा बॉयफ्रेंड अर्सलान गोनीने रेहानला शुभेच्छा दिल्या आहेत. याशिवाय हृतिकचे वडील राकेश रोशन यांनी व्हिडीओवर लिहिलं आहे, "अभिनंदन रेहान. ही फक्त सुरुवात आहे. अजून बऱ्याच संधी येणं बाकी आहेत."

## 'लाल' बादशाह फ्रेंच ओपनमधून बाहेर; हा शेवटचा सामना असेल तर..., राफेल नदाल भावूक



22 वेळा ग्रँडस्लॅम चॅम्पिअन राहिलेल्या राफेल नदालला फ्रेंच ओपनच्या पहिल्या टप्प्यात १४ वेळच्या चॅम्पिअन अलेक्झांडर ज्वेरेवकडून दारुण पराभव पत्करावा लागला आहे. जगातील चौथ्या नंबरच्या खेळाडूने नदालला 6-3, 7-6 (7/5), 6-3 अशा तीन सरळ सेटमध्ये धूळ चारली आहे.

२००५ मध्ये ग्रँडस्लॅम जिंकल्यानंतर रोलांड गॅरोसमध्ये झालेल्या ११६ सामन्यांमध्ये नदालची ही चौथी हार आहे. तर पॅरिसमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात नदालचा हा पहिलाच पराभव आहे. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे नदालचा हा क्ले कोर्टावरील सलग दुसरा पराभव आहे.

नदालला अखेरचे खेळताना पाहण्यासाठी मैदान प्रेक्षकांनी खचाखच भरले होते. जवळपास १५ हजार लोक हा सामना पाहण्यासाठी आले होते. तीन तास हा सामना चालला. यापैकी बहुतांशी वेळ ज्वेरेवने वर्चस्व गाजविले. सामन्यात परतण्यासाठी नदाल खूप संघर्ष करत होता. यावेळी त्याने त्याचे प्राबल्य असलेले फटके मारले. प्रेक्षकांनीही त्याच्या खेळाला चांगली दाद दिली.

कदाचित हा नदालचा शेवटचा सामना ठरण्याची शक्यता आहे. नदालनेही याचे संकेत दिले आहेत.

तुमच्या सर्वांसमोर ही शेवटची वेळ असेल की नाही माहीत नाही. मला खात्री नाही. पण जर हा शेवटचा सामना असेल तर मी त्याचा आनंद घेतला आहे. आज माझ्या मनातल्या भावना शब्दात व्यक्त करणे कठीण आहे, अशा शब्दांत नदालने आपल्या भावना व्यक्त केल्या. 22 वेळचा ग्रँडस्लॅम चॅम्पियन नदाल 3 जून रोजी 38 वर्षांचा होईल. नदाल हा जानेवारी २०२३ पासून हिप आणि पोटाच्या दुखापतीने त्रस्त आहे. यामुळे कदाचित लवकरच तो निवृत्ती जाहीर करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दुखापतींमुळे त्याची क्रमवारी 275 व्या क्रमांकावर घसरली आणि फ्रेंच ओपनमध्ये तो प्रथमच बिगरमानांकित खेळाडू ठरला.

भारतालाही धक्का...

भारताच्या सुमित नागलला फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेतील पदार्पणाच्या सामन्यात रशियाच्या कॅरेन खाचानोव्हकडून सरळ सेटमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले आहे. खाचानोव्हच्या दमदार सर्व्हिस आणि धारदार फटक्यांमुळे नागल हैराण झाला होता. तिसऱ्या सेटमध्ये नागलने चांगला खेळ केला. परंतु पहिल्या दोन सेटमध्ये त्याला काहीच करता आले नव्हते.

अखेर तिसरा सेटही खाचानोव्हने जिंकून नागलचा 2-6, 0-6, 6-7 (5-7) पराभव केला.

## पाकिस्तानच्या सर्वात लठ्ठ खेळाडूला वर्ल्ड कपसाठी संधी; शाहिद आफ्रिदीने दिला घरचा आहेर



आगामी ट्वेंटी-२० विश्वचषकासाठी सर्वच संघ तयारीला लागले आहेत. भारतीय संघाची पहिली बॅच न्यूयॉर्कला पोहोचली आहे. सध्या पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात चार सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळवली जात आहे. ही मालिका संपताच दोन्हीही संघ अमेरिकेला रवाना होतील. पाकिस्तान आणि इंग्लंड यांचा विश्वचषकात एकही सराव सामना होणार नाही. पाकिस्तानने विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. यामध्ये यष्टीरक्षक आझम खानला देखील संधी मिळाली आहे. याचाच दाखला देत माजी खेळाडू शाहिद आफ्रिदीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे कान टोचले.

आझम खानचा फिटनेस पाहता मी त्याला कधीच राष्ट्रीय संघाच्या जवळ देखील येऊ दिले नसते असे आफ्रिदीने सांगितले. पाकिस्तानातील एका चॅनेलवर बोलताना आफ्रिदी म्हणाला की, मी आझम खानचा फिटनेस पाहता कधीच संघाच्या जवळ येऊ दिले नसते. त्याच्यात टॅलेंट आहे हे मान्य असले तरी त्याचा फिटनेस चांगला नाही. तो मोठे फटके मारण्यात माहिर आहे. इंग्लिश खेळपट्टीवर त्याला मदत मिळेल यात शंका नाही. पण वेस्ट इंडिजमध्ये तो संघर्ष करताना दिसण्याची शक्यता आहे. या अशा फिटनेसवर त्याला यष्टीरक्षकाची जबाबदारी पार पडता येणार नाही असे मला वाटते.

पाकिस्तानचा विश्वचषकासाठी संघ -

बाबर आझम (कर्णधार), अब्रार अहमद, आझम खान, फखर जमान, हारिस रौफ, इफ्तिखार अहमद, इमाद वासीम, मोहम्मद अब्बास आफ्रिदी, मोहम्मद आमीर, मोहम्मद रिझवान, नसीम शाह, सैम अयुब, शाबाद खान, शाहीन शाह आफ्रिदी, उस्मान खान.

## शाहिद कपूर आणि मीरा कपूर यांनी खरेदी केलं तब्बल इतक्या कोटींचं अपार्टमेंट; किंमत वाचून व्हाल थक्क



बॉलीवूड स्टार शाहिद कपूर आणि त्याची पत्नी मीरा कपूर नेहमी चर्चेत असतात. नुकतीच दोघांनी वरळी येथे एक मालमत्ता खरेदी केली आहे. या मालमत्तेसाठी त्यांनी तब्बल ५९ कोटींचा खर्च केला आहे.

प्रवेश केलेल्या नोंदणी कागदपत्रांनुसार बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर आणि पत्नी मीरा कपूर यांनी मुंबईतील वरळी भागातील ओबेरॉय ३६० वेस्ट प्रकल्पात सुमारे ₹ ५९ कोटींची आलिशान अपार्टमेंट खरेदी केली आहे. हे लक्झरी अपार्टमेंट ५,३९५ चौरस फूट रेरा कार्पेट क्षेत्रफळाच्या जागेवर उभी आहे आणि त्यात पार्किंगच्या तीन जागा आहेत, असं कागदपत्रांवरून कळतंय.

२४ मे २०२४ रोजी ₹५८.६६ कोटी किमतीच्या मालमत्तेचा व्यवहार नोंदविला गेला, असंही कागदपत्रांवरून दिसून आलं आहे. ही अपार्टमेंट ओबेरॉय रियल्टीने बांधलेल्या हाय-राईझच्या वरच्या मजल्यावर आहे. ही अपार्टमेंट शाहिद व मीरा कपूर या दाम्पत्याने फेब्रुवारी २०२३ मधील एका मोठ्या व्यवहारामध्ये 'चांदक रिअल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड'कडून विकत घेतली होती.

"चांदक रियल्टीने ही विशिष्ट अपार्टमेंट सुमारे ₹६५,००० प्रतिचौरस फूट या किमतीने खरेदी केली होती आणि आता ती ₹ १ लाख प्रतिचौरस फूट या किमतीने विकली गेली आहे. एक वर्षाच्या कालावधीत ही रक्कम ५०% पेक्षादेखील जास्त आहे," असं एका रिअल इस्टेट सल्लागाराने हे 'हिंदुस्तान टाइम्स'ला सांगितलं.

ओबेरॉय रियल्टीचे ३६० वेस्ट या प्रकल्पात दोन टॉवर्स आहेत; ज्यात फोर BHK, फाइव्ह BHK आणि डुप्लेक्स अपार्टमेंट्स व पेंटहाऊस आहेत. या सी व्ह्यू (sea-view) प्रकल्पाला ३६० वेस्ट असं नाव मिळालं. कारण-त्याची उंची ३६० मीटर आहे आणि सर्व अपार्टमेंट पश्चिमेकडे (वेस्ट) आहेत. हा एक रेडी-टू-मूव्ह-इन उबेर लक्झरी गृहनिर्माण प्रकल्प आहे.

कागदपत्रांनुसार, कपूर यांनी व्यवहारासाठी ₹१.७५ कोटी मुद्रांक शुल्क भरले आहे. २०१८ मध्ये शाहिद कपूरने त्याच इमारतीत ८,२८१ चौरस फूट आकाराची एक अपार्टमेंट ₹ ५५.६० कोटींना खरेदी केली होती आणि ₹ २.९१ कोटी मुद्रांक शुल्क भरले होते. म्हणजेच शाहिद कपूरने मुंबईतील वरळी येथील ओबेरॉय रियल्टीच्या ३६० वेस्ट प्रकल्पात खरेदी केलेली ही दुसरी मालमत्ता आहे.

दरम्यान, शाहिद कपूरच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर रोशन ॲण्ड्र्यूज दिग्दर्शित देवा या आगामी चित्रपटात शाहिद झळकणार आहे. या चित्रपटात शाहिद कपूर आणि पूजा हेगडे यांची जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०२२: ऑल दॅट ब्रीदस् - या भारतीय माहितीपटाने ७५ व्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये गोल्डन आय (L'Oeil d'or) पुरस्कार जिंकला. २०२२: सिद्धू मूसवाला - पंजाबी गायक यांची गोळ्या घालून हत्या.

२०२२: तारा एअर फ्लाइट १९७ दुर्घटना हे विमान नेपाळ मध्ये कोसळले. यात असलेले १९ प्रवासी आणि ३ कर्मचारी यांचे निधन.

१९५३ : माऊंट एव्हरेस्ट - एडमंड हिलरी व शेर्पा टेन्झिंग नॉर्गे यांनी दुपारी ११:३० वाजता माऊंट एव्हरेस्ट हे जगातील सर्वोच्च शीखर सर केले.

१९१९: अल्बर्ट आइनस्टाइन यांच्या सामान्य सापेक्षता सिद्धांताची चाचणी घेण्यात आली.

१९१४: आर.एम.एस. इंप्रेस ऑफ आयर्लंड - जहाज बुडून त्यात १९९२ लोकांचे निधन.

१८४८ : अमेरिका - विस्कॉन्सिन अमेरिकेचे ३०वे राज्य झाले.

१७२७: पीटर (दुसरा) - रशियाचा झार बनला.

**जन्म**

१९४०: फारूख लेघारी - पाकिस्तानचे ८वे राष्ट्रपती (निधन: २० ऑक्टोबर २०१०)

१९४०: ताइहो कोकी - ४८वे योकोझुना, जपानी सुमो (निधन: १९ जानेवारी २०१३) १९२९ : पीटर हिग्ज - ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ

१९१७: जॉन एफ. केनेडी - अमेरिकेचे ३५वे राष्ट्राध्यक्ष (निधन: २२ नोव्हेंबर १९६३)

१९१४: शेर्पा टेन्झिंग नॉर्गे एडमंड हिलरी यांच्यासोबत सगळ्यात पहिल्यांदा माउंट एव्हरेस्ट शीखर सर करणारे गिर्यारोहक (निधन: ९ मे १९८६)

**निधन**

२०२२: सिद्धू मूसवाला - पंजाबी गायक (जन्म: ११ जून १९९३)

२०१०: ग. प्र. प्रधान - समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक (जन्म: २६ ऑगस्ट १९२२)

२००७: स्नेहल भाटकर - संगीतकार (जन्म: १७ जुलै १९१९)

१९९५: मार्गारेट चेस स्मिथ - यूएस हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह आणि युनायटेड स्टेट्स सिनेट या दोन्ही ठिकाणी सेवा देणाऱ्या पहिल्या महिला (जन्म: १४ डिसेंबर १८९७)


१९८७ : चौधरी चरण सिंग भारताचे ५ वे पंतप्रधान व लोकदल पक्षाचे संस्थापक (जन्म: २३ डिसेंबर १९०२)

## ५५ लाख रुपयांच्या मानधनावरुन रिंकू सिंग म्हणाला

रिंकू सिंगने आपल्या वादळी फलंदाजीसह गेल्या दोन वर्षांत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. IPL 2023 मध्ये सलग ५ चेंडूत ५ षटकार मारून KKR ला विजयाकडे नेल्यानंतर रिंकूने मागे वळून पाहिले नाही. त्याने भारतासाठी टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करत आपल्या खेळीची छाप पाडली आहे. रिंकूच्या बॅटने आयपीएल २०२४ मध्ये अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली नाही. त्याला टी-२० विश्वचषक संघातही राखीव खेळाडू म्हणून स्थान मिळाले आहे. यंदा केकेआरने आयपीएल २०२४चे तिसरे जेतेपद पटकावले, या विजयानंतर रिंकू सिंगचे वक्तव्य चर्चेत आहे. रिंकू सिंगला आयपीएलमध्ये खेळण्यासाठी मिळणारे मानधन चकित करणारे आहे. केकेआरकडून खेळण्यासाठी त्याला फक्त ५५ लाख रुपये मिळतात. रिंकूला केकेआरने २०२२ च्या लिलावात संघात सहभागी केले. त्यावेळी त्याचे नाव इतके मोठे नव्हते. याच कारणामुळे लिलावात मोठी बोली त्याच्यावर लागली नाही.

## स्क्रीनकडे बघून डोळे सतत कोरडे होतात? फक्त 'हा' एक व्यायाम करा, 'ड्राय आय सिंड्रोम'ची समस्या झटक्यात दूर; वाचा तज्ज्ञांचा सल्ला

करोना साथीच्या काळात मोठ्यांपासून ते अगदी लहान मुलांमध्येही स्क्रीनकडे पाहण्याच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे आजच्या डिजिटल युगात अगदी अभ्यासापासून ते ऑफिसच्या कामानिमित्त प्रत्येकाला मोबाइलची गरज पडते. त्यामुळे स्क्रीनकडे दीर्घकाळ टक लावून पाहणे आता अगदीच सामान्य गोष्ट झाली आहे. पण, यामुळे डोळे कोरडे पडण्याच्या किंवा इतर अनेक समस्यांना सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. या समस्येलाच 'ड्राय आय सिंड्रोम', असं म्हणतात.



स्क्रीन, एअर कंडिशनिंगच्या दीर्घकाळ संपर्कामुळे अनेक व्यक्तींना अस्वस्थता, जळजळ आणि दृष्टिदोषाचा त्रास होऊ लागतो, तर इन्स्टाग्रामवर कंटेन्ट क्रिएटर ॲलन मँडेल याने या समस्येवर एक उपाय सुचविला आहे. हा उपाय म्हणजे तुम्हाला फक्त 'एका मिनिटासाठी तुमचे डोळे मिचकवायचे आहेत.' जेव्हा आपण स्क्रीनकडे बराच वेळ एकटक पाहतो, तेव्हा डोळे कमी लुकलुकतात; ज्यामुळे डोळे कोरडे होतात, डोळ्यांची जळजळ होते, असे त्यांनी सांगितले आहे.

ॲलन मँडेल पुढे म्हणतात की, डोळ्यांची उघडझाप (मिचकावणे) या व्यायामाचा काळजीपूर्वक सराव केल्याने मेबोमियन ग्रंथी उघडू शकतात.

## राशि भविष्य

**मेष**: तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. दुस-यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. कौटुंबिक जबाबदा-या या तुमच्या डोक्यावर येतील आणि तुमच्या मनावर दडपण येईल. तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल - कारण तुमचे प्रियजन तुमच्यासाठी आनंद निर्माण करतील.

**वृषभ**: आपल्या मित्रांबरोबरील अथवा कुटुंबियांबरोबरील रम्य सहली तुम्हाला आराम पोहचवतील. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. तुमच्या कुटुंबातील सदस्य सांगतील ते तुम्हाला काहीच मान्य होणार नाही - परंतु त्यांच्या अनुभवातून काहीतरी शिका.

**मिथुन**: घरगुती काळजी तुम्हाला बेचैन करेल. ज्या लोकांनी कुणाकडून उधार घेतलेले आहे त्यांना आज कुठल्या ही परिस्थितीत उधार चुकवावे लागू शकते ज्यामुळे आर्थिक स्थिती थोडी कमजोर होईल. कुटुंबातील सदस्यांसोबत काही अडचणी निर्माण होती परंतु त्याचा मन:शांतीवर विपरीत परिणाम होऊ देऊ नका.

**कर्क**: मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल. संततीच्या योजना करण्यासाठी उत्तम दिवस आहे. अनोखा नवा रोमान्स तुमचा उत्साह वाढवणारा आणि तुमचा मूड उल्हसित करणारा असेल.

**सिंह**: स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. आपल्या धनाचा संचय कसा करावा याचे कौशल्य आज तुम्ही शिकू शकतात आणि याच कौशल्याला शिकून तुम्ही आपले धन वाचवू शकतात. व्यवस्थित संवाद साधून आणि सहकार्याने जोडीदाराशी संबंध सुधारतील.

**कन्या**: संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. जे लोक लघु उद्योग करतात त्यांना आजच्या दिवशी आपल्या कुठल्या ही जवळच्या लोकांचा सल्ला मिळू शकतो. ज्यामुळे आर्थिक लाभ ही मिळण्याची शक्यता आहे.

**तूळ**: तुमच्यातील मूल जागे होईल आणि तुम्ही एकदम खेळीमेळीच्या मूडमध्ये जाल. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. एखाद्या ठिकाणी आपणास कधीच बोलावले नाही अशा ठिकाणचे आमंत्रण आले तर त्याचा आदबीने स्वीकार करा.

**वृश्चिक**: तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. आज तुम्हाला धन संबंधित काही समस्या असण्याची शक्यता आहे परंतु, तुम्ही तुमच्या कौशल्याने हानीला ही नफ्यामध्ये बदलू शकतात. तुमच्याकडे खूपच कमी सहनशीलता आज असेल - परंतु कठोर बोलणे किंवा असंतुलित बोलणे यामुळे आजूबाजूचे लोक अस्वस्थ होतील.

**धनु**: कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो. त्यामुळे कामावर लक्ष विचलित होईल. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. आपल्या मुलांबरोबरचे आपले नातेसंबध निकोप असू द्यात.

**मकर**: तुमची संध्याकाळ काहीशा मिश्र भावनांमुळे तणावाची ठरू शकते. परंतु, चिंता करण्याचे कारण नाही - कारण निराशेपेक्षा आनंद-समाधान यामुळे तुम्ही खुशीत राहाल. अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल. तुमच्या खेळकर-खोडकर स्वभावामुळे अवतीभवतीचे वातावरण प्रसन्न बनेल.

**कुंभ**: तुमचे आरोग्य आणि ऊर्जा बचतीची सवय तुम्हाला दीर्घ काळ प्रवासाच्या योजनेसाठी फायदेशीर ठरेल. अतिशय व्यस्त असूनही तुम्ही आरोग्य चांगले राखल्यामुळे थकवा येणार नाही. जे लोक दुधाच्या व्यवसायाने जोडलेले आहे त्यांना आज आर्थिक लाभ होण्याची प्रबळ शक्यता आहे.

**मीन**: तुमचे व्यक्तिमत्व आज एखाद्या अत्तरासारखे काम करील. आजच्या दिवशी तुम्हाला आपल्या त्या मित्रांपासून सावध राहायचे आहे जे तुमच्याकडून उधार मागतात आणि नंतर परत करत नाही. ज्येष्ठ नातेवाईक त्यांच्या समस्येवर तुम्ही उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा बाळगतील.

# पुण्यातील ख्यातनाम नूमवि प्रशालेत होणार मोठा बदल....



● पुणे : माध्यमिक शाळेतील घटत्या विद्यार्थिसंख्येमुळे नूतन मराठी विद्यालयाची प्राथमिक शाळाही आता नूमवि प्रशालेतच भरविण्यात येणार आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय लागू होणार असून, शहरातील मराठी शाळांमधील घटत्या विद्यार्थिसंख्येचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला आहे.

नूतन मराठी विद्यालय (नूमवि) १४१ वर्षे जुने आहे. मोठा लौकिक असलेल्या या शाळेने अनेक उत्तमोत्तम विद्यार्थी घडवले. मात्र, गेल्या दोन दशकांत पालकांचा इंग्रजी शाळांकडे वाढलेला प्रचंड ओढा नूमविसारख्या ख्यातनाम शाळेलाही मारक ठरू लागला आहे.

नूमवि प्राथमिक शाळेचे अप्पा बळवंत चौकात केळकर रस्त्याच्या सुरुवातीला स्वतंत्र आवार आहे. तेथे पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरतात. हे सर्व वर्ग यंदापासून बाजीराव रस्त्यावरील नूमवि प्रशालेच्या आवारात भरतील. त्यामुळे आता एका सत्रात प्राथमिक, तर एका सत्रात माध्यमिक अशी दोन सत्रांत शाळा भरेल. 'नूमवि'च्या पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांना अजूनही चांगला प्रतिसाद आहे. मात्र, पाचवीपासूनची विद्यार्थिसंख्या कमालीची रोडावली आहे. अनेक विद्यार्थी चौथीनंतर वेगळ्या शाळांत प्रवेश घेतात, अशी स्थिती आहे. त्या पार्श्वभूमीवर, दोन्ही शाळा एकाच आवारात भरल्यास चौथीनंतर होत असलेली विद्यार्थिगळती थांबवता येऊ शकेल, असा विचार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

शाळेच्या पहिली ते चौथीच्या इयत्तांत मिळून ६८१ विद्यार्थी आहेत. एका इयत्तेसाठी चार वर्ग असून, प्रत्येक वर्गात किमान ४० विद्यार्थी आहेत. काही इयत्तांत तर एकेका वर्गात ५० विद्यार्थीही असून, सध्या पहिलीसाठी नवीन प्रवेश सुरू आहेत. पाचवी ते दहावी इयत्तांत मात्र मोठी प्रवेशक्षमता असूनही संख्या कमी आहे. काही काळापूर्वीपर्यंत पाचवी ते दहावीसाठी शाळेत प्रत्येक इयत्तेसाठी आठ वर्ग होते. प्रत्येक वर्गात ६० याप्रमाणे एका इयत्तेतच जवळपास ५०० विद्यार्थी असत. आता पाचवी ते दहावी मिळून जेमतेम ७०० विद्यार्थी आणि प्रत्येक इयत्तेसाठी तीनच वर्ग राहिले आहेत. त्या मानाने अकरावी आणि बारावीला चांगला प्रतिसाद असून, दोन्ही इयत्तांत मिळून सुमारे १७०० विद्यार्थी आहेत.

## प्राथमिक शाळेच्या आवारात काय होणार?

प्राथमिक शाळा आता प्रशालेच्या आवारात जाणार असल्याने प्राथमिक शाळेच्या आवाराचे काय होणार, असा प्रश्न विचारला जात आहे. या शाळेच्या आवारात चारेक दशकांपूर्वी बाग आणि लहान मुलांसाठी खेळणी होती. मात्र, नंतर तेथे इमारत बांधली गेली. आता शाळाच स्थलांतरित होते आहे. नूमविची पालकसंस्था असलेल्या शिक्षण प्रसारक मंडळीने याबाबत अद्याप निर्णय घेतला नसल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र, प्राथमिक शाळेच्या स्थलांतराच्या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता आहे.

## इतर शाळांनाही फटका

मराठी शाळांना मिळणारा प्रतिसाद कमी झाल्याचा फटका इतरही नामांकित शाळांना बसला आहे. सेवासदन संस्थेच्या कै. सौ. सुंदराबाई राठी मुलींच्या प्रशालेतील विद्यार्थिनीसंख्याही घटली आहे, अशी माहिती संस्थेचे सरचिटणीस चिंतामणी पटवर्धन यांनी दिली. शाळेची पाचवी ते बारावीची मिळून प्रवेशक्षमता ८०० असूनही जेमतेम निम्म्या जागा भरलेल्या आहेत. 'संस्थेच्या सोलापूरमधील मराठी शाळेला मात्र चांगला प्रतिसाद असून, तेथे प्रवेशासाठी चुरस असते,' असे पटवर्धन म्हणाले. दरम्यान, पटसंख्येअभावी अनेक शाळांत शिक्षकांवरही टांगती तलवार असून, काही मराठी शाळांत तर शिक्षकांनाच विद्यार्थी आणण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत.

'पालकांचा इंग्रजी शाळांकडे कल वाढत असल्याने मराठी शाळांना प्रतिसाद कमी झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, विविध उपक्रम आयोजून हा प्रतिसाद वाढविण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. प्राथमिक शाळेत केलेल्या प्रयोगांना चांगले यश मिळाल्याने तेथील विद्यार्थिसंख्या टिकून आहे,' असे नूमविचे शाला समिती अध्यक्ष पराग ठाकूर यांनी सांगितले.

# नाशिक, सिन्नर तालुक्यात चारा टंचाईचे संकट



● नाशिक: उष्णतेच्या लाटेत जिल्ह्यात सर्वत्र पाणी टंचाईच्या झळा बसत असताना काही भागात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. नाशिक आणि सिन्नर तालुक्यात चारा टंचाईचे संकट उभे ठाकले आहे. या दोन्ही तालुक्यात मे महिनाभर पुरेल इतकाच चारा असल्याने पशुधनासाठी बाहेरून चाऱ्याची व्यवस्था करावी लागणार आहे. मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाल्यास चाऱ्याचे उंचावलेले दरही कमी होतील, अशी अपेक्षा आहे.

प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालयाच्या अहवालानुसार पशु धनासाठी सात तालुक्यांत जूनअखेरपर्यंत तर, प्रत्येकी एका तालुक्यात जुलै व ऑगस्टपर्यंत आणि दोन तालुक्यांत सप्टेंबरपर्यंत चारा पुरेल, अशी स्थिती आहे. या वर्षी पाणी टंचाईचे संकट सर्वत्र भेडसावत आहे. नाशिक व सिन्नर या तालुक्यात जोडीला चारा टंचाईचा प्रश्न उभा राहिला आहे. नाशिक जिल्ह्यात लहान-मोठे एकूण ५८ हजार ४६६ तर सिन्नर तालुक्यात एक लाख ७९ हजार १८३ इतके पशूधन आहे. नाशिक तालुक्यात चारा उपलब्धतेते फारसे स्त्रोत नाहीत. त्यामुळे या भागास एरवी बाहेरील चाऱ्यावर अवलंबून राहावे लागते.

सिन्नर तालुक्यात चारा टंचाईमुळे काही पशुपालकांना जिथे चाऱ्याची व्यवस्था होईल, तिथे स्थलांतरीत करावे लागत आहे. मे महिन्याच्या अखेरीस मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावल्यास नैसर्गिकरित्या चारा उपलब्ध होईल, अशी या विभागाला आशा आहे. १० जूनपर्यंत पाऊस न झाल्यास पशू संवर्धन विभागाकडून टंचाई भासणाऱ्या भागात चाऱ्याचे नियोजन केले जाणार असल्याचे सांगितले जाते. जिल्ह्यातील चारा शेजारील जिल्ह्यात नेण्यास प्रतिबंध आहे. चाऱ्याचे दरही सध्या गगनाला भिडल्याचे पशूपालक सांगतात. जिल्ह्याच्या हद्दीत उत्पादित होणारा चारा इतर जिल्ह्यांमध्ये नेण्यास प्रतिबंध आहे.

पशूधन, चाऱ्याची गरज कशी ?

जिल्ह्यात दोन लाख २२ हजार २६ लहान, आठ लाख ६६ हजार २८४ मोठी जनावरे तर आठ लाख ५२ हार ९५५ शेळ्या-मेंढ्या असे एकूण १९ लाख ४१ हजार २६५ पशूधन आहे. त्यांना दर महिन्याला साधारणत: एक लाख ८६ हजार १५० मेट्रिक टन चारा लागतो. तर महिन्याकाठी तीन कोटी ६० लाख ८८ हजार चारा लिटर त्यांची पाण्याची गरज आहे.

तालुकानिहाय चारा स्थिती

जिल्ह्यात मालेगाव, कळवण, नांदगाव, त्र्यंबकेश्वर, निफाड, येवला व चांदवड या तालुक्यात जूनअखेरपर्यंत चाऱ्याची उपलब्धता आहे. पेठमध्ये जुलैअखेरपर्यंत, बागलाण व इगतपुरी ऑगस्ट तर देवळा, सुरगाणा, दिंडोरी तालुक्यात सप्टेंबर, ऑक्टोबरपर्यंत चारा पुरेल अशी स्थिती असल्याचे अहवालात म्हटले आहे. नाशिक व सिन्नर चाऱ्याची स्थिती चिंताजनक आहे. या दोन्ही ठिकाणी मेपर्यंत पुरेल इतकाच चारा आहे.

# नृसिंहवाडीत १६ जानेवारीला पूर परिषदेचे आयोजन



● कोल्हापूर : महापुराचे गंभीर सावट दरवर्षी कोल्हापूर जिल्ह्यावर असते. कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक महापुराचा फटका शिरोळ तालुक्यात बसतो. याचे तालुक्यातील श्री क्षेत्र नरसिंहवाडी येथे १६ जूनला आंदोलन अंकुश, सांगली कृष्णा पूर नियंत्रणकृती समितीच्यावतीने पूर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे , अशी माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली. पूर नियंत्रणासाठी सांगली कृष्णा महापूर नियंत्रण कृती समिती तसेच आंदोलन अंकुश सातत्याने काम करतात त्या संघटना संभाव्य पुराच्या पार्श्वभूमीवर सध्या सक्रिय झाले असून कुरुंदवाड येथील टेनिस क्लब येथे सोमवारी पत्रकार बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस जल अभ्यासक विजयकुमार दिवाण, आंदोलन अंकुश संघटनेचे प्रमुख धनाजी चुडमुंगे, सांगली कृष्णा पुर नियंत्रन कृती समितीचे निमंत्रक सर्जेराव पाटील, प्रदीप वायचळ, दीपक पाटील यांची प्रमुख उपस्थित होते. यावेळी धनाजी चुडमुंगे यांनी सांगितले की, पावसाळा सुरू झाला की जिल्हा प्रशासन महाराष्ट्र सरकार आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठकी घेऊन सक्रिय राहतात आपत्ती व्यवस्थापनावर हजारो रुपये खर्च करण्यापेक्षा पूर येऊ नये यासाठी वर्षभर काम करणे गरजेचे आहे असे सांगून नरसिंह वाडी येथील विठ्ठल मंदिरात १६ जून रोजी पूरपरिषद घेण्यात येणार आहे. पुराचे कारणे, उपाययोजना कोणत्या कराव्यात यास अन्य जल अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. पूर परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी संजय कोरे सुयोग हावळ महादेव काळे, आप्पासाहेब कदम , राकेश जगदाळे , महिपती बाबर आदी उपस्थित होते.

# 'नून सफारी'! ताडोबात वाघापेक्षा महसुलाचीच चिंता अधिक...

● नागपूर : ताडोबा प्रशासनाने गाभा आणि बफर क्षेत्रासह प्रादेशिक विभागातही व्याघ्रपर्यटन सुरू केले आहे. एवढेच नाही तर सफारीच्या नियमित वेळांव्यतिरिक्त सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत 'नून सफारी' नावाचा नवाच प्रकार सुरू केला आहे. त्यामुळे ताडोबा प्रशासनाला वाघांच्या सुरक्षेपेक्षा वाघाच्या नावावर मिळणाऱ्या महसुलाची अधिक काळजी आहे का, असा प्रश्न व्याघ्रप्रेमींकडून विचारला जात आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प प्रशासनाने बफर क्षेत्रात व्याघ्रपर्यटनासाठी १४ पर्यटन प्रवेशद्वार सुरू केले. आता तर प्रादेशिकमध्येही सफारी सुरू करण्यात आली आहे. या व्याघ्रप्रकल्पाचे तत्कालीन क्षेत्र संचालक एन.आर. प्रवीण यांच्या कार्यकाळातच हा प्रस्ताव तयार झाल्याचे कळते. मध्य चांदाअंतर्गत कारवा हे नवे प्रवेशद्वार पर्यटनासाठी सुरू करण्यात आले.

याशिवाय शेडेगाव बीटात चिमूरजवळ सफारी लवकरच सुरू होत आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रीय महामार्गावरील ७५० मीटरच्या भुयारी मार्गाला लागून हे प्रवेशद्वार आहे. मध्य चांदामध्येच जोगापूर व चंद्रपूर प्रादेशिकमध्ये चोरा येथूनही व्याघ्रसफारी सुरू करण्यात आली आहे. त्यापेक्षा गंभीर बाब म्हणजे, जुनोना येथून 'नून सफारी'च्या नावाखाली सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत सहा पर्यटक वाहने सोडण्यात येत आहेत.

या सर्व सफारीसाठी ऑनलाईन नव्हे तर प्रत्यक्ष नोंदणी केली जात आहे. शिवाय पर्यटकांना त्यांची वाहने आत नेण्याची मुभा आहे. त्यासाठी प्रवेशशुल्क आकारले जाते. ताडोबा



आणि परिसरात पर्यटनाचा भार वाढत असल्याने वाघ बाहेर पडत आहेत. पर्यटक वाहने वाघाला घेराव घालत आहेत. नियमांना बगल देत हा प्रकार सुरू असल्याने वन्यजीवप्रेमींनी त्यावर टीका केली आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात वाघाची वाट अडवण्याचा प्रकार हा संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षितपणाचा कळस आहे. वाघाच्या नावावर पर्यटनात वाढ करायची, पण त्याची सुरक्षा वाऱ्यावर सोडायची हे धोरण राबवले जात आहेत. आता तर प्रादेशिक विभागातही त्यांनी व्याघ्रपर्यटन सुरू केले आहे. दुपारीदेखील काही ठिकाणी सफारी सुरू झाली आहे. अशावेळी वाघ जंगलाबाहेर आलेत तर त्यांना जेरबंद केले जात आहे. हे चुकीचे आहे. – दिनेश खाटे, अध्यक्ष, हॅबिटॅट कन्झर्वेशन सोसायटी.

आम्ही सफारी सुरू केल्या आहेत, पण त्यामागे व्याघ्रसंवर्धनाप्रती लोकांना जागरूक करणे हा उद्देश आहे. त्यासाठी फार थोडे प्रवेशशुल्क आम्ही आकारतो. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या नियमाअंतर्गतच सर्व नियोजन करण्यात आले आहे. यात कुठेही नियम डावलण्याचा प्रयत्न झालेला नाही.

**– कुशाग्र पाठक, उपसंचालक, बफरक्षेत्र.**

# In a first, DU to start a Single Girl Quota across all programmes



● Delhi University Tuesday began its admission process for the 2024-25 academic year for undergraduate courses. The new session is likely to commence on August 1, DU Dean of Admissions Haneet Gandhi said.

This year, DU has introduced the Single Girl Child quota under its supernumerary category, where a single girl will be admitted under this quota based on merit across programmes.

Launching the Common Seat Allocation System (CSAS) admission portal, Gandhi said the admission process will be held in two phases— first phase for registration and the second for seat allocation after the qualifying Common University Entrance Test (CUET) results are declared.

Like last year, admission to all programmes are based on scores obtained in CUET. For undergraduate aspirants, on offer are around 71,000 seats for 79 undergraduate programmes and 183 BA programme combinations in 69 colleges.

In CUET 2023-24 XX and XX were the most sought- after courses with over 1 lakh students showing interest in both. Gandhi said " In CUET 2023-24, B Com (Hons) and B Com were the most sought after courses with over 1 lakh students showing interest in both"

The university, like last year, will admit more students than the number of seats available to account for withdrawals later in the academic session.

"This year the number of students admitted were 20% more than the available seats in the general category and under the SC/ST and PwD category an additional of 30% students will be admitted" said Registrar Vikas Gupta.

This, Gupta added, would be the first step to avoid multiple mop-up rounds, which the university had to hold in the previous year, to fill seats in multiple colleges.

Last year, after three rounds of admissions, including a special and a final spot round was held for as many as 1,000 seats in undergraduate courses at a few DU colleges— out of the 71,000 on offer— were yet to be filled. To accommodate more students, the varsity had decided to hold a mop-up admission round to admit candidates in "shortlist colleges and programmes only"

After decades of admissions through cutoffs based on class XII marks, DU has adopted the entrance test based admission system last year. In 2021, the last year of cut-off based admissions, 10 programmes across colleges had a set 100% cutoff.

# Flash mob at Mumbai's Bandra railway station raises awareness on periods

● Ahead of the Menstrual Hygiene Day on May 28, a specially choreographed flash mob performed in front of the crowded Bandra railway station in Mumbai on Monday morning to raise awareness about menstrual health and hygiene.

The performance, put together by Ujaas, an initiative under Aditya Birla Education Trust, in collaboration with indie rapper and poet Saniya MQ.

The event saw Saniya MQ unveiling her new song, titled 'Ye Laal Rang – Periods'. With thought-provoking lyrics such as 'Jaante nahi kyunki kam hai jaankari, 23 million ladkiya har saal school chhod jari", it highlighted the significantly high number of school dropouts seen



among menstruating girls every year. The song and choreography, which included stunts like flips, were performed twice between 11.30 am and 12.30 pm and caught the attention of commuters and passersby.

The performance was centred on this year's Menstrual Hygiene Day theme 'Together for a #PeriodFriendlyWorld', which aims to empower girls to embrace their menstrual health journey with confidence and dignity.

# How this Pune chemical engineer is planning to wipe out carbon emissions pumped out from industrial chimneys

● When India assumed the presidency of the G20, one of the highlights was an international seminar on 'Carbon Capture Utilization and Storage (CCUS)'organised in Bengaluru by the National Thermal Power Corporation (NTPC) Ltd, on behalf of the Power Ministry signified the country's attention to the issue.

CCUS is the process of capturing carbon dioxide emissions from coal and other fossil fuel-powered industries and ensuring that, either through reusing it or storing it so that the greenhouse gas does not enter the atmosphere.

All this time in Pune, a research-based start-up, Greenovate Solutions and its founder Ronak Mistry, has been working hard at Bhau Institute of Innovation, Entrepreneurship and Leadership, and Venture Center at NCL Innovation Park, to reach the same goals that the government was aspiring to.

India is trying to figure out how CCUS can be brought and executed as well, says Ronak Mistry, a chemical engineer who set up the startup in 2019, a year before he completed his course.

## थोडक्यात



### धारावीत अग्नितांडव, फर्निचर गोदाम खाक; ६ जण जखमी!

● मुंबई , प्रतिनिधी :

मुंबईतील धारावी भागात एका फर्निचर गोदामाला मंगळवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. गोदामामध्ये लाकडी सामान असल्यानं आग झपाट्याने पसरली. आगीत ६ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

धारावीच्या ९० फीट रोडवर अशोक मिल कंम्पाऊंडमधील एका तीन मजली गाळ्यात आग लागली. इलेक्ट्रीक शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. स्थानिकांनी तातडीनं अग्निशमन दलाला पाचारण केलं. शर्थीच्या प्रयत्नांनंतर सकाळी ८ वाजताच्या सुमारास अग्निशमन दलाला आग विझवण्यात यश आलं. सध्या कुलिंग ऑपरेशन सुरू आहे. जखमींना सायन रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

जखमींची नावे पुढीलप्रमाणे-

सलमान खान (२६), मनोज (२६), अमजद (२२), सलालुद्दीन (२८), सैदुल रेहमान (२६), रफीक अहमद (२६)

### मुख्यमंत्री पदावरुन हटवण्याबाबत योगींची पहिली प्रतिक्रिया

● उत्तर प्रदेश , प्रतिनिधी :



लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशातील 80 पैकी 80 जागा जिंकण्याचा दावा भारतीय जनता पक्ष करत आहे. निवडणुकीनंतर पक्ष योगी आदित्यनाथ यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवेल, असे विरोधकांचं म्हणणं आहे. आजतकशी खास संवाद साधताना मुख्यमंत्री योगी यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. “मी एक योगी आहे. सत्तेसाठी नाही तर पक्षाची मूल्य आणि तत्त्वांसाठी काम करणं हे माझं प्राधान्य आहे” असं योगींनी म्हटलं आहे. 400 पारवर मुख्यमंत्री योगी म्हणाले की, “हा फक्त विश्वास नसून हे होणार आहे. हा देशाचा मंत्र बनला आहे. उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम, देशातील प्रत्येक वर्गाने, प्रत्येक समुदायाने ही घोषणा आपल्या जीवनाचा एक भाग बनवली आहे, मोदीजींची लोकप्रियता, त्यांनी गेल्या 10 वर्षात केलेले कार्य, हे सर्व लक्षात घेऊन, सुरक्षा, आदर, स्थानिक पातळीवरील विकास आणि गरिबांचे कल्याण या सर्व गोष्टी लक्षात घेऊन जनता जनार्दन या घोषणेला सत्यात उतरवत आहे. 4 जूनला निकाल लागल्यानंतर पुन्हा एकदा मोदी सरकार आणि एनडीएसोबत 400 चं लक्ष्य गाठू.”

# दिल्ली वाराणसी विमानात बॉम्ब असल्याची चिठ्ठी, बाहेर पडण्यासाठी प्रवाशांची धावाधाव

● दिल्ली , प्रतिनिधी :

दिल्लीहून वाराणसीला जाणाऱ्या विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याची अफवा पसरली आणि या विमानाचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. विमान विमान तळावर पोहचताच प्रवाशांनी बाहेर पडण्यासाठी गर्दी केली होती. काही प्रवाशांनी तर आपात्कालीन मार्गाचा वापर करत विमानातून बाहेर पडण्यास प्राधान्य दिलं. बॉम्ब ठेवल्याची बातमी समोर आल्याने आपात्कालीन मार्ग आणि मुख्य दरवाजे यांमधून प्रवाशांना सुरक्षित पद्धतीने बाहेर काढण्यात आलं. त्यानंतर हे विमान तपासणीसाठी खुल्या ठिकाणी नेण्यात आलं होतं.

दिल्ली विमानतळावर घडली घटना




दिल्ली विमानतळावर ही घटना घडली आहे. पहाटे साडेपाचच्या सुमारास उड्डाणपूर्वी इंडिगो क्रूला वॉशरुममध्ये एक चिठ्ठी सापडली आहे. त्यामध्ये विमानात बॉम्ब ठेवल्याचं म्हटलं होतं. यामुळे क्रूने विमानतळ प्रशासनाला ही माहिती दिली. त्यानंतर प्रवाशांना खाली उतरण्यास सांगितलं. विमान मोठं असल्याने मधली जागा अरुंद असल्याने दोन्ही दरवाजे आणि आपात्कालीन दरवाजेही उघडले. त्यानंतर काही प्रवाशांनी या मार्गातूनही उड्या मारल्या या घटनेचा व्हिडीओही व्हायरल झाला आहे. सगळे प्रवासी सुखरुप असल्याचं विमानतळ प्रशासनाने स्पष्ट केलं.

श्वान पथकाला करण्यात आलं पाचारण

या सगळयानंतर श्वान पथकाला पाचारण करण्यात आलं. तसंच बॉम्ब निरोधक पथकाने विमानाची तपासणी केली. त्यानंतर ही अफवा असल्याची बाब समोर आली. टॉयलेटमध्ये एक टिश्यू पेपरवर बॉम्ब असं लिहिण्यात आलं होतं. त्यामुळे विमान खुल्या भागात नेण्यात आलं. तिथे विमानाची कसून तपासणी करण्यात आली ज्यामध्ये काहीही सापडलं नाही. दिल्लीत मागच्या महिन्यात ५० हून अधिक शाळांमध्ये बॉम्ब ठेवल्याचा मेल पाठवण्यात आला होता. यामुळे बरीच अफरातफर झाली होती. शाळेत आलेल्या मुलांना घरी पाठवण्यात आलं. तसंच शाळांमध्ये श्वान पथकं आणि बॉम्ब निरोधक पथक पाठवण्यात आली होती आणि शाळांची तपासणी करण्यात आली होती. हा मेलही अफवाच होता असंही स्पष्ट झालं.

## ग्राहकांच्या नावांनी बनावट खाती उघडली

### RBI ने दोन बँकांना ठोठावला कोट्यवधींचा दंड, तुमचं खातं तर ‘या’ बँकेत नाही ना?



● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

भारतीय रिझर्व्ह बँकने २७ मे रोजी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ICICI बँक आणि YES बँकेवर आर्थिक दंड ठोठावला आहे. सेंट्रल बँकेने आयसीआयसीआय बँकेला १ कोटी रुपये आणि येस बँकेवर ९१ लाख रुपये दंड ठोठावला आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. मनी कंट्रोलने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

येस बँक आणि आयसीआयसीआय बँकेने मार्दर्शक तत्वांचे पालन केले नसल्याचा ठपका आरबीआय़ने ठेवला आहे. येस बँकेने ग्राहकांच्या सेवा, कार्यालयीन खात्यांशी निगडीत मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. आरबीआयसमोर अशा अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसंच झिरो बॅलन्स खात्यात मिनिमम बॅलन्स न ठेवल्याने बँकेने शुल्क वसूल केले. तसंच कार्यालयीन खात्यांमधून बेकायदा कामे केली आहे. त्यामुळे आरबीआयने एस बँकेला दंड ठोठावला आहे. येस बँकेने २०२२ या वर्षात अनेकदा नियमांचं उल्लंघन केलं आहे. एवढंच नव्हे तर ग्राहकांच्या नावाने काही अंतर्गत खाती उघडून ती कार्यान्वित करण्यात आली होती.

## शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश करणार?

### शिक्षणमंत्री केसरकर म्हणाले, “तो श्लोक अतिशय चांगला”

● मुंबई , प्रतिनिधी :

राज्य सरकारकडून शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात समर्थ रामदास यांचे ‘मनाचे श्लोक’ आणि ‘भगवद्गीते’तील श्लोकांचा समावेश केला जाणार आहे. तर भारतीय मूल्यांची ओळख करून देण्यासाठी ‘मनुस्मृती’तील श्लोकाचा वापर केला जाणार आहे. यावरुन आता नव्या वादाला तोंड फुटलंय. माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे. तर हिंदू जनजागृती समितीने मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश करण्याला पाठिंबा दर्शवला आहे. पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संविधान नाकारण्यासाठी मनुस्मृती आणली



जात असल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ‘एससीईआरटी’ने महाराष्ट्र राज्याचा शालेय अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला असून त्यावर आक्षेप आणि सूचनाही मागवल्या आहेत. परंतु, यावरुन आता नव्या वादाला सुरुवात झाली आहे. मुलांना भारतीय मूल्यांची ओळख करून देण्यासाठी ‘मनुस्मृती’ या वादग्रस्त ग्रंथामधील काही श्लोकांचा वापर करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. आता हा निर्णय सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या वादाचा मुद्दा बनला आहे. पुरोगामी विचारवंत आणि साहित्यिकांनी, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटाने त्यास विरोध दर्शवला आहे. दरम्यान, राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटलं आहे की मनुस्मृती ग्रंथावर लोकांचा आक्षेप असला तरी ज्या श्लोकाचा अब्यासक्रमात समावेश करण्याचा विचार केला जात आहे तो श्लोक अतिशय चांगला आहे.

## डेरा प्रमुख राम रहीमला मोठा दिलासा, माजी मॅनेजर रणजीत हत्येप्रकरणी हायकोर्टाने निर्दोष ठरवले

● नवी दिल्ली , प्रतिनिधी :

डेरा सच्चा सौदा प्रमुख बाबा गुरमीत राम रहीमला दिलासा मिळाला आहे. डेरा माजी व्यवस्थापक रणजीत याच्या हत्या प्रकरणात राम रहीमला उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. उच्च न्यायालयाने सीबीआय न्यायालयाचा निर्णय रद्द केला आहे. या प्रकरणात राम रहीमसह ५ दोषींची निर्दोष सुटका केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे प्रकरण २२ वर्षे जुने आहे, यामध्ये सीबीआय कोर्टाने डेरा प्रमुख राम रहीमला १९ वर्षांनंतर दोषी ठरवले होते. राम रहीम सध्या तुरुंगात असून पत्रकार हत्या आणि साध्वी बलात्कार प्रकरणात तो दोषी ठरला आहे.

ही घटना १० जुलै २००२ ची आहे. शिबिराच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य असलेल्या कुरुक्षेत्रातील रणजित सिंह यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. साध्वीच्या लैंगिक शोषणाचे निनावी पत्र लिहायला रणजित सिंहने आपल्या बहिणीला मिळवून



दिल्याचा डेरा व्यवस्थापनाला संशय होता. पोलिस तपासावर असमाधानी रणजित सिंह यांचा मुलगा जगसीर सिंह याने जानेवारी २००३ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सीबीआय तपासाची मागणी केली होती. त्यानंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले आणि सध्या ऑक्टोबर २०२१ मध्ये राम रहीमसह पाच आरोपींना दोषी ठरवण्यात आले.

## जगप्रसिद्ध पण पुण्यात बदनाम झालेल्या पोर्शे कारच्या टीमने डेटा मिळविला; बिल्डर ‘बाळा’ची कुंडली मिळणार...

● पुणे , प्रतिनिधी :

पोर्शे ही अलिशान कार कंपनी जगभरात प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून बिल्डर विशाल अग्रवालच्या लाडक्या बाळाच्या प्रतापांमुळे पुण्यातच नाहीत तर देशभरात बदनाम झाली आहे. पोर्शे कार भरधाव वेगात चालवत बिल्डरच्या मद्यधुंद बाळाने दोघांना उडविल्याने पोर्शे कारची चर्चा होत आहे. या अपघाताची चौकशी करण्यासाठी पोर्शेची टीम पुण्यात दाखल झाली असून कारमध्ये रेकॉर्ड असलेली माहिती ताब्यात घेतली आहे. पोर्शेची टीम आरटीओसोबत मिळून या कारची तपासणी करत आहे. कारची अशी तपासणी प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या अपघाती मृत्यूनंतर मर्सिडीज कंपनीने केली होती. यामध्ये कारचा अपघातावेळचा वेग, कितीवेळा किती वेगाने कार चालविली, हार्ड ब्रेकिंग,



सीटबेल्ट लावला होता का अशा अनेक गोष्टींचा डेटा जमा करण्यात आला होता. या अलिशान कंपन्यांच्या कारमध्ये चिप लावलेल्या असतात. त्यामध्ये हा डेटा सेव्ह केलेला असतो. आता इलेक्ट्रीक स्कूटरमध्येही अशा प्रकारचे तंत्रज्ञान वापरण्यात येत आहे. पोर्शे कंपनीचे तंत्रज्ञ या कारची तपासणी करत आहेत. यामध्ये बिल्डर बाळाने अपघात केला तेव्हाचा कारचा असलेला वेग, वेळ, कितीवेळा कार हार्ड ब्रेकिंग करण्यात आली, कितीवेळा वेगाने चालविण्यात आली याचा डेटा या आरटीओला दिला जाणार आहे. तसेच कारमध्ये इनबिल्ट डॅशकॅम होते. त्याचेही रेकॉर्डिंग मिळविण्यात आले आहे. या सर्व माहितीचा वापर बिल्डर बाळाविरोधातील भक्कम पुराव्यांसाठी केला जाणार आहे. बिल्डर विशाल अग्रवालच्या वकिलांनी पोर्शे कारमध्ये समस्या होती, असा दावा कोर्टात केला होता. याची तक्रारही कंपनीकडे केलेली आहे, असाही युक्तीवाद त्यांनी केला होता.

### ब्लड सॅम्पल अहवालच पुरावा नाही...

कल्याणीनगर भागात १९ मे रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास अपघात झाला. त्यानंतर बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल याच्या अल्पवयीन बाळाला ताब्यात घेण्यात आले. अपघातानंतर सकाळी नऊच्या सुमारास बाळाला ससून रुग्णालयात नेण्यात आले. सकाळी अकराच्या सुमारास रक्ताचे नमुने घेण्यात आले. ससून रुग्णालयातील प्राथमिक रक्त तपासणी अहवाल नकारात्मक (निगेटिव्ह) आला. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना या अहवालाचा संशय आल्याने १९ मे रोजी सायंकाळी सातच्या सुमारास औंध येथील जिल्हा रुग्णालयात अल्पवयीन बाळाचे रक्ताचे नमुने घेण्यात आले. रक्ताच्या नमुन्याचे अहवाल रविवारी (दि. २६) पोलिसांना मिळाले. दोन्ही अहवालात मुलाच्या रक्तात मद्यांश आढळून आला नाही. या प्रकरणी दोन पोलिसांना निलंबित करण्यात आले असून ससूनच्या डॉक्टरांनीही ब्लड सॅम्पल बदलल्याने त्यांनाही अटक करण्यात आली आहे.

## इंडिया आघाडीत मानापमान नाट्य?



### बैठकीला जाण्यास ममता बॅनर्जींचा ठाम नकार; कारण काय दिले?

● बंगाल , प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली आहे. ०१ जून रोजी लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदान होणार आहे. त्यानंतर ०४ जून रोजी मतमोजणी आहे. तत्पूर्वी ०१ जून रोजी इंडिया आघाडीने सामील सर्व घटक पक्षांची एक बैठक बोलावली असून, ती महत्त्वाची मानली जात आहे. मात्र, या बैठकीपूर्वीच इंडिया आघाडीतील बिघाडी पुन्हा एकदा समोर आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याचे कारण म्हणजे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीच्या या बैठकीला जाण्यास नकार दिला आहे.


मतमोजणी विषयासंदर्भात विविध दृष्टिकोनांतून विश्लेषण करणे हा ०१ जूनच्या बैठकीचा उद्देश आहे. लोकसभा निवडणुकांच्या ०४ जूनला होणाऱ्या मतमोजणीनंतर जो निकाल लागेल, त्यामुळे काय परिस्थिती उद्भवू शकते, त्यावर काय उपाययोजना करता येईल, अशा विषयांवर या बैठकीत चर्चा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

मात्र, मतमोजणीच्या आधीच विरोधी पक्षांच्या आघाडीतील ऐक्य धोक्यात आले आहे. तृणमूल काँग्रेसने या बैठकीत सामील होण्यास नकार दिला आहे.

इंडिया आघाडीच्या बैठकीला जाण्यास ममता बॅनर्जींचा ठाम नकार

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी १ जूनच्या बैठकीचे निमंत्रण इंडिया आघाडीच्या घटक पक्षांना दिले होते. तृणमूल काँग्रेसलाही या बैठकीला बोलाविण्यात आले होते. परंतु, अखेरचा सातवा टप्पा ०१ जून रोजी असून त्या दिवशी बंगालमध्ये नऊ जागांसाठी मतदान आहे. त्यामुळे दिल्लीत त्या दिवशी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत आम्ही सामील होऊ शकत नाही, असे तृणमूलने कारण पुढे केले आहे. सध्या त्या नऊ जागांवर तृणमूलचे खासदार असून तिथे आपले वर्चस्व कायम राखण्यासाठी पक्षाने सर्व लक्ष केंद्रित केले आहे, असेही सांगण्यात आले. दरम्यान, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची ०२ जून रोजी तिहार तुरुंगात पुन्हा रवानगी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनाही इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहाता यावे म्हणून ०१ जून रोजी बैठक आयोजिण्यात आली आहे. या बैठकीला तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, तेजस्वी यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुक अब्दुल्ला, माकपचे नेते सीताराम येचुरी आदी नेत्यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

## वैनगंगेच्या पुराचा दाब, ओढे-नाले होतात फुल्ल



● आष्टी, प्रतिनिधी :

गडचिरोली-चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या वैनगंगा नदीला पावसाळयात येणाऱ्या पुरामुळे नदीकाठच्या गावांना पुराचा फटका बसतो. त्यात शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी होते. पशुधनाची जीवितहानी होते.

आष्टीजवळून बारमाही वाहणाऱ्या वैनगंगा नदीचे पात्र फार मोठे आहे. या नदीलगत कढोली, जयरामपूर, इल्लूर, ठाकरी, चपराळा, गणपूर, आष्टी, अनखोडा आदी गावे आहेत. मध्य प्रदेशात आलेल्या पावसाचे पाणी संजय सरोवर व गोसेखुर्द धरणात साठवून ठेवले जाते. धरणाच्या पाण्याची पातळी वाढल्यास संजय सरोवर व गोसेखुर्द धरणाचे पाणी सोडले जाते. त्यामुळे पावसाळयात अर्धी भरून असलेल्या वैनगंगा नदीला लवकरच पूर येतो. आष्टीजवळच्या पुलावर ५ फूट पाणी वाढल्यास पुराचे पाणी कढोली, जयरामपूर, इल्लूर, ठाकरी, गणपूर, चपराळा आदी गावांतील शेतात शिरते. त्यामुळे धानाचे पीक पूर्ण पाण्याखाली येत असल्याने धान सडून जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते.

आष्टीच्या विश्रामगृहाजवळील शेती पाण्याखाली येते. वैनगंगेच्या पुराच्या दाबामुळे अनखोडा नाल्यावर पाणी चढते. त्यामुळे नाल्यालगत असलेल्या शेतात पाणी भरून राहते. त्यामुळे या परिसरातील धान, कापूस आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

## “लोकसभा निवडणुकीत काय होईल हे ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही”- अजित पवार

● मुंबई , प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या सातव्या टप्प्यातील मतदान ०१ जून रोजी होणार आहे. तर, ०४ जून रोजी मतमोजणी आहे. महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून मिळणाऱ्या जागांबाबत विविध दावे केले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसअजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी केलेल्या विधानानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले वक्तव्य चर्चेत आले आहे. अजित पवार यांनी केलेल्या विधानावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्याचे सांगितले जात आहे.

देश कुठे चालला आहे? जग कुठे चालले आहे? आपण कुठे चाललो आहोत? आपण जातीपातीमध्ये अडकून बसतो आहोत. ज्यावेळी आपण महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा मानतो. त्यांचा आदर्श समोर ठेवून पुढे जातो. राज्यातील काही जिल्ह्यात



जातीयवादावर निवडणूक झाली. मराठा आणि इतर समाज असे काही वातावरण गावात पाहायला मिळाले, असे अजित पवार यांनी म्हटले.

लोकसभा निवडणुकीत काय होईल हे ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही

आम्ही ज्यावेळी महाविकास आघाडीत एकत्र काम करायचो. तेव्हा आम्हाला सांगायचे की, शिवसेनेबाबत टोकाची भूमिका घ्या. काय कुठे कसे गणित बदले. लोकसभा निवडणुकीत काय होईल, हे ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही, असे अजित पवार यांनी म्हटले आहे. आगामी काही महिन्यांमध्ये विधानसभा निवडणूक जाहीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राजकीय पक्ष आतापासूनच विधानसभेच्या तयारीला लागल्याचे पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत अजित पवार बोलत होते.

दरम्यान, मला आपल्याला सांगायचे आहे की, आधीच चारशे पार...चारशे पार ही घोषणा देण्यात आली आणि संविधान बदलणार हे दलित समाजाच्या मनावर इतके बिंबले की ते काढता काढता नाकी नऊ आले. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एका टीव्ही मुलाखतीत १५ ते २० मिनिटे हेच सांगत होते की आम्ही संविधान बदलणार नाही, उलट संविधान दिन साजरा करणार आहोत. मात्र या सगळ्याचा परिणाम आपल्याला आताच्या निवडणुकीत जाणवला, अशी जाहीर कबुली छगन भुजबळ यांनी दिली.